मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शुक्रवार, दि. 13 मार्च 2026 | पान- 1

# भूसंपादनासाठी निधी कमी पडू देणार नाही : मुख्यमंत्री फडणवीस

## आमदार महेश लांडगे यांच्या लक्षवेधीवर राज्य शासनाचा प्रतिसाद; पुणे-पिंपरी-चिंचवडमधील रस्ते, विकास प्रकल्पाना गती देण्याची मागणी





**पिंपरी | प्रतिनिधी**

"पुणे मेट्रोपोलिटन रिजनमध्ये सुरू असलेल्या रस्तेविकास आणि इतर प्रकल्पांचे भूसंपादन करण्यासाठी गती देण्यात येईल. आवश्यक निधी महापालिका आणि राज्य शासन दोन्हीकडून उपलब्ध करून दिला जाईल. कालबद्ध नियोजनासाठी लवकरच आढावा बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

पुणे मेट्रोपोलिटन रिजन (PMR) मधील वाढत्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी आज विधानसभेत जोरदार चर्चा झाली. आमदार महेश लांडगे यांनी पुणे–नाशिक महामार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडी आणि एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पातील भूसंपादन प्रक्रियेबाबत राज्य शासनाचे लक्ष वेधले. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात सकारात्मक प्रतिसाद दिला.

आमदार लांडगे म्हणाले की, पुणे–नाशिक महामार्ग (NH-60) नाशिक फाटा ते इंद्रायणी नदीपर्यंत ६१ मीटर रुंदीकरणासाठी भूसंपादन पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी मंजूर करण्याची आवश्यकता आहे. नाशिक फाटा ते खेड दरम्यान प्रस्तावित एलिव्हेटेड कॉरिडॉर व जोड रस्ते प्रकल्प लवकरच सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच, संपूर्ण PMR क्षेत्रात वाहतूक व्यवस्थापनासाठी सिंगल पॉईंट अथॉरिटी आवश्यक आहे. एमआयडीसी रस्त्यांचे आधुनिकीकरण करुन औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक सुलभ करण्यासाठी विशेष पुढाकर घेण्याची आवश्यकता आहे. पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण पुणे महानगर प्रदेशात मेट्रो नेटवर्क वाढवावा, अशी मागणी सभागृहात केली.

तसेच, केंद्र सरकार आणि राज्य सरकारने या महामार्गासाठी एलिव्हेटेड कॉरिडॉरची घोषणा केली आहे, मात्र १०० टक्के भूसंपादन न झाल्यामुळे रुंदीकरणाचे काम सुरू करता येत नाही. त्यासाठी कालबद्ध नियोजन करून भूसंपादन लवकर पूर्ण करण्याची गरज आहे. देवाभाऊंच्या नेतृत्त्वाखाली पुणे मेट्रोपोलिटन रिजनमध्ये शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले गेले आहेत आणि आगामी काळात सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या या परिसरात विकासाचे रोल मॉडेल तयार होईल, असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

> **महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी भूसंपादन निधी लवकरात लवकर उपलब्ध करण्यात येईल. काही निधी महापालिका उपलब्ध करेल. त्यांच्या माध्यमातून भूसंपादन होईल. तसेच, पीएमआरडीए आणि राज्य सरकार अशा पातळीवरही निधी उपलब्ध करून देण्यासाठी आढावा बैठक घेण्यात येईल.**
> **- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.**

# "बॉक्स स्ट्रक्चर"मुळे वाकड ते मामुर्डी पट्ट्यातील वाहतूक कोंडी फुटणार..!

## आमदार शंकर जगताप यांच्या पाठपुराव्याला यश; नवीन आठ ठिकाणी 'बॉक्स स्ट्रक्चर' उभारणार






**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील वाकड ते मामुर्डी या पट्ट्यात होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आमदार शंकर जगताप यांनी मागणी केलेल्या नवीन आठ ठिकाणी 'बॉक्स स्ट्रक्चर' (अंडरपास) उभारण्याबाबत शासन सकारात्मक असून, त्याबाबतची तांत्रिक माहिती घेण्याचे काम सुरू असल्याचे नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी गुरुवारी सांगितले. यामुळे हिंजवडी आयटी पार्कसह, किवळे, रावेत, पुनावळे, ताथवडे, आणि वाकड परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मुंबईतील अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार शंकर जगताप यांनी तारांकित प्रश्नाद्वारे या भागातील गंभीर वाहतूक समस्या मांडली. वाकड ते मामुर्डी दरम्यान गेल्या काही वर्षांत आयटी पार्क, शैक्षणिक संस्था आणि मोठ्या गृहप्रकल्पांमुळे नागरीकरण वाढले आहे. मात्र, महामार्गाची अपुरी क्षमता आणि ग्रेड सेपरेटरच्या अभावामुळे स्थानिक वाहतूक व महामार्गावरील वाहने एकमेकांत मिसळल्याने तासनतास कोंडी होत असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

सयाजी अंडरपास, भुमकर चौक, ताथवडे, पुनावळे, पवना नदी क्रॉसिंग, किवळे जंक्शन आणि मामुर्डी अशा एकूण आठ महत्त्वाच्या ठिकाणी नवीन अंडरपास व 'बॉक्स स्ट्रक्चर' प्रस्तावित आहेत. या कामांमुळे महामार्ग क्रॉसिंग करणे सुकर होईल आणि सेवा रस्त्यांवरील भार कमी होईल.

### प्रलंबित कामांबाबत सभागृहाचे लक्ष वेधले

**» गेल्या आठ महिन्यांपासून सुरू असलेल्या संथ गतीच्या कामांमुळे वाकड आणि रावेत परिसरात वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढले आहे. ही कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी आग्रही मागणी जगताप यांनी केली. त्यावर उत्तर देताना राज्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, आमदार जगताप यांनी सुचवलेल्या आठ अंडरपासबाबत शासनाकडून तांत्रिक तपासणी सुरू असून लवकरच सकारात्मक पावले उचलली जातील.**

> **"हिंजवडी आयटीपार्कसह, किवळे, रावेत, पुनावळे, ताथवडे, आणि वाकड हा परिसर शहराच्या विकासाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. त्यामुळे महामार्गावरील रस्त्यांच्या संदर्भातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करणे आणि नवीन आठ ठिकाणी अंडरपास उभारणे हाच यावरील कायमस्वरूपी उपाय आहे. विधानसभेत हा प्रश्न मांडल्यानंतर शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून, ही कामे लवकरात लवकर मार्गी लावून मी हा परिसर वाहतूक कोंडीमुक्त करण्यासाठी कटिबद्ध आहे."**
> **- शंकर जगताप, आमदार**

# अवैध गॅस रिफिलिंगवर पोलिसांची नजर

## घरगुती सिलिंडरचा गैरवापर थांबवण्यासाठी आयुक्त विनयकुमार चौबे यांचे कठोर कारवाईचे आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

अमेरिका आणि इस्रायलच्या इराणविरोधात सुरु असलेल्या युद्धामुळे गॅसची टंचाई जाणवू लागल्याने व्यावसायिक वापरासाठीचे गॅस सिलेंडर मिळणे बंद झाले आहे. घरगुती वापराचे सिलिंडर मिळत आहेत. घरगुती गॅस सिलिंडरची टंचाई प्रत्यक्षात निर्माण होऊ नये यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी कठोर कारवाईच्या सूचना पोलिसांना दिल्या आहेत.

मागील काही दिवसांपासून व्यावसायिक कारणांसाठी मिळणारा गॅस बंद झाला आहे. सरकारने घरगुती वापराच्या गॅस पुरवठ्याला प्राधान्य दिले आहे. अशामध्ये गॅसच्या किमती देखील वाढल्या आहेत. व्यावसायिक वापरासाठी गॅस उपलब्ध होत नाही. याचा गैरफायदा घेऊन घरगुती वापराच्या सिलिंडर मधून व्यावसायिक सिलिंडर मध्ये गॅस रिफिलिंग करून तो चढ्या दराने विक्री होण्याचे प्रकार घडण्याची शक्यता आहे. याला प्रतिबंध करण्यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी सर्व प्रभारी अधिकाऱ्यांना कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत.

घरगुती वापराच्या सिलिंडर मधून व्यावसायिक गॅस सिलिंडर मध्ये गॅस रिफिलिंग करताना कोणी आढळून आल्यास त्याबाबत नागरिकांनी पोलिसांना तक्रार करावी. ०२०-२७३५२६००, २७३५२५००, ९५२९६९१९६६ आणि ११२ या क्रमांकावर तक्रार करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. नागरिकांकडून माहिती मिळाल्यास संबंधित ठिकाण आणि व्यक्तीची खातरजमा करून कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

औद्योगिक गॅसच्या तुटवड्यामुळे येथील हजारो कंपन्यांना दररोज कोट्यवधी रुपयांचा फटका बसत आहे. १८०० रुपयांचा सिलिंडर पाच हजार रुपयांना खरेदी करावा लागत आहे. मात्र हा साठा देखील मर्यादित आहे. पुढील काही दिवसात चढ्या दराने मिळणारे सिलिंडर देखील मिळणे बंद होणार आहे. करोना नंतर आता पुन्हा हे संकट आल्यामुळे उद्योजकांचे मोठे नुकसान होत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

लघु उद्योजक जाचक वस्तू व सेवा कर (जीएसटी), नोटाबंदी, महागाई, करोना काळातील टाळेबंदी, बँकेचे कर्ज, थकलेले हप्ते यातून अद्याप सावरले नाहीत. आता युद्धामुळे उद्भवलेल्या औद्योगिक गॅस पुरवठ्याच्या समस्येवर केंद्र व राज्य शासनाने लवकरात लवकर तोडगा काढावा. औद्योगिक गॅस पुरवठा सुरळीत करून सहकार्य करावे, अशी मागणी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली.




### पोलिसांकडून तक्रार नोंदवण्याचे आवाहन

**» घरगुती सिलिंडरमधून व्यावसायिक सिलिंडरमध्ये गॅस रिफिलिंग करून विक्री केल्याचे आढळल्यास नागरिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी ०२०-२७३५२६००, २७३५२५००, ९५२९६९१९६६ तसेच आपत्कालीन क्रमांक ११२ वर संपर्क साधता येणार आहे. नागरिकांकडून मिळालेल्या माहितीची खातरजमा करून संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असे पिंपरी चिंचवड पोलिस यांनी स्पष्ट केले आहे.**

### उद्योगांवर आर्थिक ताण वाढला

**» औद्योगिक गॅसच्या तुटवड्यामुळे पिंपरी-चिंचवड औद्योगिक पट्ट्यातील हजारो लघु उद्योग अडचणीत आले आहेत. अनेक उद्योगांना उत्पादन सुरू ठेवण्यासाठी चढ्या दराने गॅस सिलिंडर खरेदी करावे लागत आहेत. साधारण १८०० रुपयांचा सिलिंडर सध्या सुमारे पाच हजार रुपयांपर्यंत विकत घ्यावा लागत असल्याचे उद्योजक सांगत आहेत. पिंपरी-चिंचवड, चाकण आणि रांजणगाव परिसरातील अनेक उद्योगांवर याचा परिणाम होत असून उत्पादन खर्च वाढल्याने आर्थिक ताण वाढत आहे.**

### घरगुती गॅसचा गैरवापर रोखण्यावर भर

**» व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा कमी झाल्यामुळे घरगुती सिलिंडरचा गैरवापर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही ठिकाणी घरगुती सिलिंडरमधील गॅस व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरून तो चढ्या दराने विक्री करण्याचे प्रकार होऊ शकतात. याला आळा घालण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलिस सतर्क झाली आहे. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. नागरिकांनी अशा प्रकारांची माहिती पोलिसांना दिल्यास तात्काळ कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.**

# समर्थ महिला बहुउद्देशीय संस्थेतर्फे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

## विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान; सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगला सोहळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या समर्थ महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनाचे उत्साहात साजरा करण्यात आला. समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव यावेळी करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस निरीक्षक चैत्राली भिसे, नगरसेविका अश्विनी वाबळे आणि नगरसेविका सीमा सावळे उपस्थित होत्या. यावेळी संस्थेतील महिलांनी सादर केलेली पारंपारिक नृत्ये, डान्स आणि फॅशन शो, ज्यातून त्यांनी उपस्थितांची मने जिंकली.






या सोहळ्यात प्रज्ञा जमदाडे व श्रद्धा शिंदे, संगीता उपरे, लता गोरडे, मीनाक्षी हांडे, शोभा रकिबे, रंजना भैरट, ताराबाई ज्ञानदेव गडाख, नंदा पावसे, मीनल राकसे, छाया बुरडे आणि भारती शेलार, सुप्रिया अनारसे, मनीषा अमृतकर, सोनाली हरणे, जयश्री करगळ, किरण लांडगे, स्मिता औटी, अलका ढोबळे, जिजाबाई शिनगारे, गुलाबाई मल्हार ढोले, प्रिया बोधल, संगीता जाधव, शितल कोठावळे, मेघना बारटक्के, शितल बारस्कर, छाया भुजबळ आणि सविता जोशी यांचा गौरव करण्यात आला.

महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्यासह त्यांना सक्षमपणे कार्यरत राहण्यासाठी या कार्यक्रमातून प्रेरणा देण्यात आली. यावेळी विविध महिला बचत गट, भजनी मंडळ तसेच ज्येष्ठ महिला समूहांचाही विशेष सत्कार करण्यात आला. संस्थेच्या संस्थापिका राजश्रीताई गागरे यांनी आपल्या मार्गदर्शनात संस्थेची कार्यप्रणाली स्पष्ट केली, तसेच व्यवसायाचे महत्त्व सांगून सर्व महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी लोकरे यांनी केले.

# पुणे महापालिकेच्या शाळांचा दर्जा उंचावणार

## 144 शाळा 'मॉडेल स्कूल' म्हणून विकसित होणार; इमारत दुरुस्ती व सुविधा वाढीसाठी 68 कोटींची तरतूद

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचविण्यासाठी, महापालिकेच्या शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न सुरु करण्यात आले आहेत. यंदाच्या वर्षी महापालिकेच्या आठ शाळा केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) अभ्यासक्रमावर आधारित नव्याने सुरु केल्या जाणार आहेत.

पुणे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी बुधवारी ही माहिती दिली. पुणे महापालिकेच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात महापालिकेच्या शाळांच्या नवीन इमारती बांधणे तसेच दुरुस्तीच्या कामांसाठी सुमारे ६८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच शहरातील ७५ संकुलांमधील एकूण १४४ शाळा 'मॉडेल स्कूल' म्हणून विकसित करण्याची योजना आखण्यात आली आहे. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी अधिक चांगल्या सुविधा, आधुनिक शिक्षण साधने आणि शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे.

महापालिकेच्या शाळांच्या काही इमारती अत्यंत जीर्ण अवस्थेत असल्याने त्यांचे स्थलांतर करणे आवश्यक आहे. जून २०२६ पर्यंत अशा १५ शाळांचे स्थलांतर करणे गरजेचे असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. त्यापैकी तीन शाळांचे स्थलांतर आधीच पक्क्या इमारतींमध्ये करण्यात आले असून काही ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात पत्र्याच्या शेडमध्ये वर्ग भरविण्याची तयारी प्रशासनाने दर्शवली आहे. मात्र धोकादायक स्थितीत असलेल्या शाळांच्या इमारतींमध्ये विद्यार्थ्यांना बसविले जाणार नाही, असेही प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.



### शिक्षकांना मदत करण्यासाठी ३०० डेटा एन्ट्री ऑपरेटर

» पालिका शाळांमधील शिक्षकांचा वेळ प्रशासकीय कामकाजात मोठ्या प्रमाणावर जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिकविण्यावर परिणाम होत असल्याचे प्रशासनाने मान्य केले आहे. या पार्श्वभूमीवर आगामी शैक्षणिक वर्षापासून सुमारे ३०० डेटा एन्ट्री ऑपरेटर नियुक्त केले जाणार आहेत. तसेच शाळांचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी ३०० स्वच्छता कर्मचारीही नियुक्त करण्यात येणार आहेत. या कामांसाठी सुमारे सात कोटी रुपयांची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. या उपाययोजनांमुळे शिक्षकांचा अध्यापनावर अधिक लक्ष केंद्रित होऊन विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार शिक्षण मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

### महापालिका शिक्षणात नवे बदल

» महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. यंदाच्या वर्षी आठ शाळा केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) अभ्यासक्रमावर आधारित सुरू केल्या जाणार आहेत. शहरातील ७५ संकुलांमधील १४४ शाळांना 'मॉडेल स्कूल' म्हणून विकसित करण्याची योजना आखण्यात आली आहे. काही शाळांच्या जीर्ण इमारतींचे स्थलांतर जून २०२६ पर्यंत करण्यात येणार आहे. तसेच शिक्षकांचा प्रशासकीय ताण कमी करण्यासाठी सुमारे ३०० डेटा एन्ट्री ऑपरेटर आणि स्वच्छतेसाठी ३०० कर्मचारी नियुक्त केले जाणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी दिली.

### सीबीएसई अभ्यासक्रमावर आठ शाळा

» महापालिकेच्या शाळांमधील शिक्षण अधिक स्पर्धात्मक आणि गुणवत्तापूर्ण करण्यासाठी आठ शाळांमध्ये केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या शाळांमध्ये आधुनिक वर्गखोल्या, डिजिटल शिक्षण साधने आणि विद्यार्थ्यांसाठी सुधारित शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. पालिका शाळांमधील पटसंख्या वाढविणे आणि खासगी शाळांना पर्याय निर्माण करणे हा या उपक्रमामागील उद्देश आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे आणि पालकांचा विश्वास वाढावा, अशी अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली आहे.

# पुण्यात 20 ते 23 मार्चला 'गौ टेक' आंतरराष्ट्रीय शिखर संमेलन आणि प्रदर्शनाचे आयोजन

## प्रदर्शनात 300 हून अधिक स्टॉल्स, गायींशी संबंधित विषयांवर 12 हून अधिक परिसंवाद, विशेष परिषदा, आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींचा सहभाग

**पुणे | प्रतिनिधी**

गायींवर आधारित उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान आणि उद्योजकतेला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी पुण्यात 'गौ टेक २०२६'हे आंतरराष्ट्रीय शिखर संमेलन आणि प्रदर्शन आयोजित करण्यात येत आहे. ग्लोबल कॉन्फेडरेशन ऑफ काऊ बेस्ड इंडस्ट्रीज (GCCI) चे संस्थापक, माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय कामधेनू आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. वल्लभभाई कथिरिया यांनी मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत या कार्यक्रमाची घोषणा केली.

हे संमेलन २० ते २३ मार्च २०२६ या कालावधीत पुण्यातील शिवाजीनगर येथील कृषी महाविद्यालय मैदानावर आयोजित करण्यात आले आहे. महाराष्ट्र गौ सेवा आयोग, RR ग्लोबल आणि IFFCO यांच्या सहकार्याने GCCI हा कार्यक्रम आयोजित करत आहे.

या प्रदर्शनात ३०० हून अधिक स्टॉल्स, गायींशी संबंधित विषयांवर १२ हून अधिक परिसंवाद, विशेष परिषदा, B2B बैठका, आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींचा सहभाग आणि ५ लाखांहून अधिक लोक उपस्थितीचा अंदाज आहे. कामधेनू चेअर, महिला परिषद, संत-शेती परिषद, गोशाळा परिषद, पंचगव्य परिषद, गोरक्षण परिषद आणि देशी गायींचे सजीव प्रदर्शन हे या संमेलनाचे प्रमुख आकर्षण असतील.

प्रदर्शनात सेंद्रिय खते, जैव-कीटकनाशके, दूध व दुग्धजन्य पदार्थ, गोमूत्र व गोबरावर आधारित उत्पादने, नैसर्गिक शेती, सेक्स-सॉर्टेड सीमेन तंत्रज्ञान, सौर व जैव-ऊर्जा, चारा व बियाणे उद्योग, कृषी यंत्रसामग्री, सरकारी व खाजगी बँका, सहकारी संस्था, दुग्धसंघ, राज्य गौ सेवा आयोग, पशूखाद्य प्रक्रिया केंद्रे, स्टार्टअप्स, संशोधन व विकास उत्पादने, देशी गायींचे सजीव प्रदर्शन तसेच निसर्गोपचार, आयुर्वेद व पंचगव्य उपचार या विभागांचा समावेश असेल.




### 'गौ टेक पुरस्कार' आणि विशेष उपक्रम

» या संमेलनात गायींवर आधारित उद्योजकता आणि गोसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल २० हून अधिक गटांमध्ये 'गौ टेक पुरस्कार' प्रदान केले जाणार आहेत. याशिवाय गोमूत्र व गोबरापासून व्यावसायिक व दैनंदिन उत्पादने बनवण्याचे सजीव प्रशिक्षण वर्गही आयोजित करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमात इंडिया पोस्ट आणि GCCI यांच्यात सामंजस्य करार (MoU) देखील झाला असून GCCI च्या वेबसाईटची नवीन आवृत्तीही प्रकाशित करण्यात आली. GCCI ने गोप्रेमी, गौ आधारित स्टार्टअप्स, महिला उद्योजिका, सेंद्रिय शेतकरी, गोशाळा, संशोधक आणि तंत्रज्ञान नवोन्मेषकांना स्टॉल बुक करण्याचे आवाहन केले आहे. या संमेलनाचे व्यावसायिक आयोजन Toredo Fairs India Pvt. Ltd. करत आहे.


# हिंजवडी आयटी पार्कमध्ये एलपीजी टंचाई

## एलपीजी पुरवठ्यात अडथळा; बाहेरील किचनमधून अन्नपुरवठा, घरून डबा आणण्याचा सल्ला

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी पार्कलाही आता एलपीजी गॅस टंचाईच्या झळा बसू लागल्या आहेत. आयटी पार्कमधील एका बड्या कंपनीच्या कॅम्पसमध्ये एलपीजी पुरवठ्यात तात्पुरता खंड पडल्याने कॅम्पसमधील फूड कोर्ट आणि कॅफेटेरियामध्ये अन्नपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना घरून डबा आणण्याच्या सूचनाही कंपनीने केल्या आहेत. यासंदर्भात कंपनीने कर्मचाऱ्यांना अंतर्गत ई-मेलद्वारे माहिती दिली आहे.

कंपनीने कर्मचाऱ्यांना पाठविलेल्या ई-मेलनुसार, एलपीजी पुरवठ्यातील अडथळ्यामुळे कॅम्पसमधील फूड कोर्टमध्ये नियमित स्वयंपाक करणे सध्या शक्य होत नसल्याने कॅफेटेरियामध्ये मर्यादित खाद्यपदार्थ उपलब्ध राहणार आहेत. परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत बाहेरील स्वयंपाकघरांमधून अन्न मागवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. याशिवाय कर्मचाऱ्यांना शक्य असल्यास घरून डबा आणण्याचा सल्ला देण्यात आला आहे. तसेच कार्यालयीन कार्यक्रम, बैठका किंवा इतर कोणत्याही उपक्रमांसाठी केटरिंगची आवश्यकता भासेल असे कार्यक्रम सध्या टाळावेत, असेही सांगण्यात आले आहे. सध्या एलपीजी पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू असून परिस्थिती लवकरच सामान्य होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तोपर्यंत कॅम्पसमधील अन्नसेवा मर्यादित स्वरूपात सुरू राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. मोठ्या कॅम्पसमध्ये दररोज हजारो लोकांसाठी अन्नव्यवस्था करणे हे आव्हानात्मक असते आणि पुरवठा साखळीत अडथळे निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम कर्मचाऱ्यांवर होतो. यामुळे कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम' द्यावे, अशी मागणी फॉर्म फॉर आयटी एम्प्लॉईजने केली आहे. सिलिंडरची उपलब्धता असलेली मर्यादित स्वरूपात खाद्यपदार्थ करून व्यवसाय बंद करण्याचे एक दिवस पुढे ढकलत आहेत. अशा परिस्थितीत आता अन्नपुरवठा मर्यादित केल्याने अविवाहित कर्मचारी तसेच पुण्यात कुटुंबीय नसलेले कर्मचारी यांची अडचण निर्माण झाली आहे.



### 'वर्क फ्रॉम होम'ची मागणी

» सध्याच्या परिस्थितीत कंपन्यांनी तात्पुरत्या स्वरूपात घरून काम (वर्क फ्रॉम होम) करण्याचा पर्याय उपलब्ध करून दिल्यास कर्मचाऱ्यांवरील ताण आणि गैरसोय काही प्रमाणात कमी होऊ शकते. मोठ्या कॅम्पसमध्ये दररोज हजारो लोकांसाठी अन्नव्यवस्था करणे हे आव्हानात्मक असते आणि पुरवठा साखळीत अडथळे निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम कर्मचाऱ्यांवर होतो. यामुळे कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम' द्यावे, अशी मागणी फॉर्म फॉर आयटी एम्प्लॉईजने केली आहे.

### कर्मचाऱ्यांची गैरसोय

» या आयटी कंपनीच्या पुण्यातील कॅम्पसमध्ये दररोज हजारो कर्मचारी कामासाठी उपस्थित राहत असल्याने अन्नपुरवठ्यातील या अडचणीचा मोठ्या प्रमाणावर परिणाम होत असल्याचे कर्मचाऱ्यांकडून सांगितले जात आहे. विशेषतः कंपनीने 'वर्क फ्रॉम होम' बंद करून 'रिटर्न टू ऑफिस' धोरण स्वीकारल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांना नियमितपणे कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक असताना अशा परिस्थितीत त्यांना गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याचेही कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

### हॉटेलही बंद

» व्यावसायिक वापराच्या एलपीजी सिलिंडरचा पुरवठा सध्या बंद करण्यात आला आहे. सिलिंडर मिळत नसल्याने शहरातील अनेक हॉटेल बंद पडू लागली आहेत. सिलिंडरची उपलब्धता असलेली मर्यादित स्वरूपात खाद्यपदार्थ करून व्यवसाय बंद करण्याचे एक दिवस पुढे ढकलत आहेत. अशा परिस्थितीत आता अन्नपुरवठा मर्यादित केल्याने अविवाहित कर्मचारी तसेच पुण्यात कुटुंबीय नसलेले कर्मचारी यांची अडचण निर्माण झाली आहे.

# शिवसेनेचे आमदार विजय शिवतारेंच्या राजकीय खेळीने पुरंदरमध्ये भाजप सत्तेपासून दूर

## पुरंदर पंचायत समितीमध्ये विजय शिवतारे यांनी राजकीय वैर बाजूला सारत राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) पाठिंबा दिला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी पुरंदरचे शिवसेना (शिंदे) पक्षाचे आमदार विजय शिवतारे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाबरोबर असलेले राजकीय वैर बाजूला ठेवून केलेल्या राजकीय खेळीने पुरंदर पंचायत समितीमध्ये भाजप सत्तेपासून दूर राहिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाशी जुळवून घेताना आमदार शिवतारे यांनी भाजपमध्ये प्रवेश केलेले काँग्रेसचे माजी आमदार संजय जगताप यांच्यावरही कुरघोडी केल्याचे स्पष्ट झाले आहे.

पुरंदर तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने बाजी मारली. जिल्हा परिषद गटात दोन, तर पंचायत समितीमध्ये ८ पैकी ४ जागा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला मिळाल्या. या निकालाने आमदार विजय शिवतारे यांच्यावर नामुष्की ओढवली.

पंचायत समितीमध्ये त्रिशंकू अवस्था निर्माण झाली होती. 'राष्ट्रवादी'च्या चार, भाजप आणि शिवसेना (शिंदे) पक्षाला प्रत्येकी दोन जागा मिळाल्या. त्यामुळे 'राष्ट्रवादी'ला सत्ता स्थापन करण्यासाठी महायुतीतील कोणत्या तरी एका पक्षाच्या पाठिंब्याची आवश्यकता होती. या ठिकाणी सत्तेत सहभागी होण्यासाठी शिवसेना (शिंदे) आणि भाजप हे दोन्ही पक्ष तयारीत होते. मात्र, आमदार शिवतारे यांनी 'राष्ट्रवादी'शी असलेले वैर विसरून पाठिंबा देण्याची तयारी दर्शविली. त्याबदल्यात पंचायत समितीचे उपसभापती पद देण्याची 'राष्ट्रवादी'ने सहमती दिली. आमदार शिवतारे यांच्या या खेळीने भाजपला सत्तेपासून दूर राहावे लागल्याचे स्पष्ट झाले आहे.

पुरंदर पंचायत समितीच्या सभापतीपदी 'राष्ट्रवादी'चे अमित झेंडे यांची सभापतिपदी शिवसेनेचे प्रवीण जगताप यांची निवड झाली आहे. यंदा सभापतिपद ओबीसी प्रवर्गासाठी राखीव असल्याने दिवे गणातून निवडून आलेले झेंडे आणि वीर गणातून निवडून आलेले जगताप यांची वर्णी लागली. दरम्यान, पुरंदरमध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन्ही 'राष्ट्रवादी'नी एकत्र येऊन निवडणूक लढवली. माजी आमदार संजय जगताप यांच्या नेतृत्वाखाली भाजपने ही निवडणूक लढवली.



### पुरंदर पंचायत समितीचे नवे सत्तासमीकरण

» पुरंदर पंचायत समितीत निवडणुकीनंतर त्रिशंकू परिस्थिती निर्माण झाली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी(अजित पवार गट) यांना ४ जागा, तर भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना (शिंदे गट) यांना प्रत्येकी २ जागा मिळाल्या. सत्ता स्थापनेसाठी राष्ट्रवादीला महायुतीतील एखाद्या पक्षाचा पाठिंबा आवश्यक होता. या पार्श्वभूमीवर आमदार विजय शिवतारे यांनी राष्ट्रवादीला पाठिंबा देत नवे राजकीय समीकरण तयार केले. त्यानंतर सभापतीपदी अमित झेंडे, तर उपसभापतीपदी प्रवीण जगताप यांची निवड झाली. या घडामोडींमुळे भाजपला सत्तेपासून दूर राहावे लागले.